# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

३ रा मजला ,नवीन मध्यवर्ती इमारत , पुणे ४११००१
दूरध्वनी क्र०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४
ईमेल -dirmktms@gmail.com web :-mahapanan.maharashtra.gov,in

---

जा.क्र पणन -५/स्थापत्य /स्वारस्य अभिव्योक्ती /माहिती/परिपत्रक/२०२१ दि.१५ / ०२ /२०२१

1622

**विषय :- कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये "स्वारस्य अभिव्योक्ती ( Expression of interest) "ही संकल्पना राबविणेबाबत .**

संदर्भ :- मा.मंत्री सहकार व पणन , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र मंत्री/सह, पणन/ व्ही.आय.पी/नोट३३३७/२०२१,दि. ०३/०२/२०२१चे पत्र.

## परिपत्रक

कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये बाजार समित्यांच्या आवारामध्ये विविध विकास कामे केली जातात. उदा. लिलाव गृहे, गोदामे, अंतर्गत रस्ते ,प्रशासकीय इमारती, व्यापारी गाळे इ. या विकासकामांच्या बांधकामासाठी या कार्यालयाकडून महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी –विक्री (विकास व विनियमन )अधिनियम १९६३ चे कलम १२( १ )अन्वये मंजुरी दिली जाते . ही सर्व विकासकामे बाजार समितीकडे असलेल्या स्वनिधी मधून केली जातात . जर बाजार समित्यांकडे पुरेशा प्रमाणामध्ये स्वनिधी उपलब्ध नसेल तर बाजार समित्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ अथवा वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून कर्ज घेऊन करतात. मात्र काही बाजार समित्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता त्यां कृषी पणन मंडळ अथवा वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून कर्ज मिळण्याच्या निकषाची पुर्तता करु शकत नाहीत . त्यामुळे निधीअभावी या बाजार समित्यांना विकास कामे करता येणे शक्य होत नाही. अशा बाजार समित्यांनाही विकास कामे करण्यासाठी "स्वारस्य अभिव्योक्ती ( Expression of interest)"द्वारे निधीची उपलब्धता होऊ शकेल. जेणेकरून बाजार समित्यांना विकास कामे विशेषतः व्यापारी गाळे बांधकाम करता येऊ शकतील. सदरचे गाळे हे कृषि पुरक व्यवसाय कण्यासाठी उपलब्ध होऊ शकतील.

गावांचे/शहरांचे विस्तारीकरण झाल्यामुळे बऱ्याच बाजार समित्यांच्या मालकीच्या जागा आता शहरालगत आल्यामुळे या जागांवर व्यावसायिक गाळयांसंबंधीची मागणी मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे



Scanned by CamScanner

व्यापारी गाळ्यांची बाजार समित्यांनी उभारणी केल्यास बाजार समित्यांना देखील त्यापोटी मिळणारे भाडे हे उत्पन्नाचे आणखी एक साधन होईल .

अपुरा निधी असलेल्या बाजार समित्यांना विकास कामे (विशेषत: व्यापारी गाळे बांधकाम ) करण्याकरीता सन २०१८ पासून पणन संचालक यांनी स्वारस्य अभिव्योक्तीची परवानगी दिलेली आहे. तथापि, स्वारस्य अभिव्योक्ती प्रक्रिया राबविणेबाबत सुसूत्रता दिसून येत नसल्यामुळे सुसूत्रता आणणे आवश्यक आहे, अशी खात्री झाल्याने स्वारस्य अभिव्योक्तीची कार्यपद्धती खालील प्रमाणे राबविणे आवश्यक आहे.

बाजार समितीकडून स्वारस्य अभिव्योक्ती राबवण्यासाठी या कार्यालयाकडे सादर करण्यात येणा-या प्रस्तावामध्ये खालील कागदपत्रांचा समावेश असावा.

(१)बाजार समितीचा विनंती अर्ज.

(२)बाजार समिती संचालक मंडळ/ प्रशासक मंडळाचा ठराव .

(३)ज्या ठिकाणी स्वारस्य अभिव्योक्ती राबवायचे आहे त्या जागेचा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर केलेला नकाशा (Lay Out).

(४)नियोजित बांधकामाचा आर्किटेक्ट यांनी प्रमाणित केलेला नकाशा.

(५) नियोजित बांधकामाचे सविस्तर इस्टिमेट.

(६)बाजार समितीकडे उपलब्ध असलेल्या स्वनिधीचे सचिवाचे स्वसाक्षांकीत प्रमाणपत्र व आर्थिक पत्रके.

(७)महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अंशदान बाबतची माहिती/ थकीत नसल्याबाबतचा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचा दाखला.

(९) संबधित तालुक्याच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचा स्थळ पाहणी अहवाल.

(१०) जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था कार्यालयाचे अभिप्राय.

उपरोक्त नमूद केलेल्या कागदपत्रांसह प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयामार्फत या कार्यालयास सादर करावा. सदर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर परिपूर्ण असलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येईल .त्यानुसार मंजुरी मिळाल्यावर बाजार समितीने खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

(१)वाजार समितीने उपलब्ध होणाऱ्या गाळ्यांबाबत जास्तीत जास्त खप असलेल्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देणे आवश्यक आहे.

(२) सदर जाहिरातीमध्ये खालील बाबींचा समावेश करावा.



Scanned by CamScanner

(अ) उपलब्ध होणाऱ्या गाळयांची संख्या.

(ब) क्षेत्रफळ .

(क) बाजार समितीने सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच बाजार भावाप्रमाणे विचार करून निश्चित केलेले भाडे व अनामत रक्कम.

(ड) इच्छुकांनी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक.

(३)उपलब्ध होणाऱ्या गाळयांच्या संख्येपेक्षा जर जास्त संख्येने इच्छुकांचे अर्ज आल्यास या गाळयांचा जाहीर लिलाव करणे आवश्यक आहे.

(४)लिलावाची सर्व प्रक्रिया ही संबंधित जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या उपस्थितीतच करण्यात यावी.

(५) इच्छुकांकडून अथवा लिलावामधून जमा झालेली रक्कम बँकेत स्वतंत्र खात्यामध्ये ठेवणे आवश्यक आहे

(६) बँकेच्या स्वतंत्र खात्यामध्ये ठेवण्यात आलेल्या रकमेचा विनियोग ज्या कामासाठी स्वारस्य अभियोक्ती राबविण्यात येत आहे, त्याच कामासाठी करणे आवश्यक आहे.

(७)बाजार समितीने निश्चित केलेल्या कालावधीत सदर गाळयांचा ताबा देण्यात यावा.

(८ )गाळयांच्या बांधकामासाठी आवश्यक असणारी रक्कम उपलब्ध झाल्यावर सदर बांधकामास महाराष्ट्र कृषी खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १२( १ )अन्वये मंजूरी मिळणेस्तव या कार्यालयाचे दि. ०८/०९/२०१९रोजीचे परिपत्रकानुसार प्रस्ताव या कार्यालयास दाखल करावा.

उक्त सुचनांचे बाजार समितीने तंतोतंत पालन होईल असे पहावे.

**(सतिश सोनी)**
**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति, १) सभापती / सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समित्या (सर्व)

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी : -
१)कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे -३७
२)विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)



Scanned by CamScanner

३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहीतीस्तव :-

१)मा.प्रधान सचिव (पणन )मंत्रालय , मुंबई - ३२ यांना सविनय सादर.

२)खाजगी सचिव, मा. मंत्री (सहकार व पणन ) मंत्रालय, मुंबई -३२



Scanned by CamScanner